महाराष्ट्र शासन
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
## सर्वोपचार रुग्णालय, धुळे
चक्करबर्डी परीसर, सुरत बायपास रोड, रेसीडेन्सी पार्क हॉटेलसमोर, धुळे
ई मेल: deangmcdhule@gmail.com वेबसाईट: www.shgmcdhule.org दुरध्वनी क्र.-०२५६२-२३९४०७/२३९४०८

जा.क्र.सरुधु/आस्था-२/कंत्राटी/वै.अ./रक्तसंअधि/तानि १२०/ 2615-20 /२०२६ दि:- 10 /०४/२०२६

वेबसाईटद्वारे प्रसिध्द (WWW.gmcdhule.org)

# " जाहीरात "

विषय:- सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेतील वैद्यकीय अधिकारी व रक्त संक्रमण अधिकारी ही रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे (Walk-in-Interview) १२० दिवसांच्या कालावधीसाठी (कंत्राटी तत्वावर ठोक मानधनाने) स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार भरण्याबाबत.....

राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या त्रूटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अबाधित सुरु राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी व रक्त संग्रमण अधिकारी यांची रिक्त पदे मा.संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळसमितीच्या शिफारशीनुसार १२० दिवसांच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवाराकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| १. | उमेदवारानी अर्ज करावयाचा कालावधी दि.१०/०४/२०२६ ते दि. २० /०४/२०२६ रोजी ०५.०० वाजेपर्यंत. |
| २. | मुलाखतीचा दिनांक :- २२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता. |
| ३. | मुलाखतीचे ठिकाण :- मा.अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांच्या दालनात. |

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनाकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत व अर्जात नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे अत्यत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर (WWW.deangmcdhule.org) प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीमधील दर्शविण्यात आलेला विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Dawnload) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपूर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात. उमेदवारानी प्रत्यक्ष येऊन कार्यालयातील आवक-जावक शाखेस आपला अर्ज सादर करावा. अर्ज सादर केल्या बाबतची पोच घ्यावी. उमेदवारानी ऑनलाईन अर्ज सादर करु नये. ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. मुलाखतीच्या वेळी उमेदवारानी मुळ प्रमाणपत्रासह व साक्षांकित केलेल्या

प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार केला जाणार नाही.

संस्थेतील वैद्यकीय अधिकारी व रक्त संक्रमण अधिकारी या पदावर १२० दिवसाच्या कालावधीसाठी निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरावयाच्या पदाचा तपशिल खालील प्रमाणे :

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदाची संख्या | Required Educational Qualification |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (कंत्राटी) | ०३ (तीन) | M.B.B.S. (NMC रजिस्टेशन आवश्यक) |
| २. | रक्त संक्रमन अधिकारी | ०१ (एक) | |

उक्त नमूद दर्शविलेल्या रिक्त जागाची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तक्त्यात नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदासाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्तपद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसासाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटी सेवा नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :

१) अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक : एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वसेवा ३, मंत्रालय, मुंबई दि.३१ डिसेंबर, २०२० अन्वये, दुर्गम व दुरस्थ भागात वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त धुळे येथील संस्थेचा समावेश असून, वैद्यकीय अधिकारी व रक्त संक्रमण अधिकारी गट-ब (वर्ग-२) या पदावर तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत असलेल्या व रुपये १५६००-३९१००/- व ग्रेड-पे रु.५४००/- या वेतनश्रेणीत वेतन व इतर भत्ते आहरित करीत असलेल्या अधिका-यांना नियमित वेतनश्रेणीऐवजी दुर्गम व दुरस्थ भागात काम करणारे एम.बी.बी.एस अर्हताधारक यांना रु.८०,०००/ (अक्षरी रुपये ऐंशी हजार मात्र) इतके दरमहा एकत्रित ठोक मानधन मंजूर केलेले आहे. सदर एकत्रित ठोक मानधन हे संस्थेत मंजूर असलेल्या १० कंत्राटी सेवा या उद्दीष्ट शीर्षाखाली भागविण्यात येईल.

३) वयोमर्यादा: उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही. तसेच मागासवर्गीय उमेदवारासाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील

४) गुणवत्ता यादी ही पदवी परीक्षेच्या समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणावर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

६) उमेदवार या सर्वोपचार रुग्णालया व्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला आहे किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७) ज्या उमेदवाराची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत अधिक काळ गैरहजर राहील्यास किंवा त्याचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवाराची निवड करताना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही, अशा उमेदवाराचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

९) सदर पदांकरीता उमेदवाराची नियुक्ती निव्वळ १२० दिवसांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात दरमहा एकत्रित ठोक मानधनाची राहील. १२० दिवसानंतर रिक्तपद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा १२० दिवसांसाठी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल अथवा नव्याने जाहीरात प्रसिध्द करुन कार्यवाही करण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारास सर्वोपचार रुग्णालय, धुळे संस्थेतील कोणत्याही संलग्न विभागात नेमणूक केली जाईल व त्यांना काम करावे लागेल. प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणत्याही विभागात नेमणूकीत बदल होऊ शकेल.

११) अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१२) सदर पदावर कार्यरत असतांना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

१३) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१४) प्रथम, द्वितीय, व तृतीय वर्ष व एम.बी.बी.एस. अंतिम वर्षाची गुणपत्रिका,एन.एम.सी./एम.एम.सी. किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र, जन्म दाखला/ शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला, पॅनकार्ड, आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५) निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्विकारण्यापुर्वी/रुजू होतांना रु.१०,०००/- अनामत रक्कम म्हणून रोखा शाखेत जमा करणे आवश्यक राहील. सदरील रक्कम नियुक्ती कालावधी समाप्त झाल्यानंतर अथवा पदाचा राजीनामा ०१ महिन्याची पुर्व सूचना देणे आवश्यक राहील, अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास अनामत रक्कम सरकार खाती जमा करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ सयाजी भामरे)
अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

प्रति,

१. वैद्यकीय अधिक्षक, सर्वोपचार रुग्णालय, धुळे.
प्राध्यापक, विकृतीशास्त्र/रक्तपेढी प्रमुख, श्री. भा.हि.शा.वै.म. व सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

२. सूचना फलकः- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्य रुग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, श्री.भा.हि.शा.वै.म. व सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/संलग्न रुग्णालय, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपूर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, गोंदिया, बारामती, नंदुरबार, सिंधुदुर्ग, अलिबाग, सातारा, परभणी, जालना, धाराशिव, नाशिक, पालघर, रत्नागीरी, अलिबाग.

४. रोखपाल, रोखपाल शाखा, सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी इच्छुक वैद्यकीय अधिकारी या पदासाठीच्या उमेदवाराकडुन (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनाकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रतः- १) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.



Scanned with OKEN Scanner

## सर्वोपचार रुग्णालय, धुळे

### वैद्यकीय अधिकारी/रक्त संक्रमण अधिकारी पदासाठी अर्जाचा नमुना

अलीकडिल काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा

प्रति,

मा.अधिष्ठाता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे.

अर्जदाराच्या पदाचे नाव :- विभागाचे नाव:-

उमेदवाराचे संपूर्ण नाव :-

कायमचा पत्ता:-

भ्रमणध्वनी क्र :- पॅन क्र.:- आधार कार्ड क्र.:-

| जन्म दिनांक :- | तारीख | महिना | वर्ष | | मुलाखतीच्या दिवशीचे वय :- | | | वर्ष | | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| योग्य ठिकाणी अशी ✓ करावी | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | SBC | OBC | EWS | OPEN | |
| | | | | | | | | | | | |

| | (जोडले आहे/नाही) | |
|---|---|---|
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| जन्म (वय) बाबत एसएससी प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची सत्यप्रत जोडावी. | होय | नाही |
| अर्जासोबत चालू आर्थिक वर्षाचे दि.३१ मार्च पर्यंतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीत असल्यास तपशिल देवून नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम/द्वितीय/तृतीय/ वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडावीत. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर परिक्षेचे गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.एम.सी.तसेच एम.सी.आय.चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| एम.एम..सी. प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युयल) केलेले असावे. | होय | नाही |
| अर्जदार हा बंधपत्रित आहे काय ?. | होय | नाही |
| असल्यास बंधपत्रित कालावधीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| बंधपत्रित असल्यास सेवा कालावधी व शिल्लक सेवा कालावधी बाबत प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न महाविद्यालयाची नाव | शासकीय /अशासकीय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष एमबीबीएस | | | | | |
| २. | एमडी/एमएस | | | | | |
| ३. | इतर | | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

अटी व शर्ती :-

१) अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र (नियुक्ती आदेश व रुजू अहवाल) नसल्यास अर्ज बाद होईल.
२) सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता एमसीआय/एनएमसी च्या मानकाप्रमाणे असावी.
३) सर्व कागदपत्रे फार्ममधील अनुक्रमानुसार लावणे गरजेचे असेल.
४) सादर केलेले सर्व प्रमाणपत्र व कागदपत्रावर स्व:ताची स्वाक्षरी करुन साक्षांकित करणे आवश्यक.
५) अर्ज पूर्ण वाचुन अर्ज पूर्ण भरावा. अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही.
६) कागदपत्रात त्रृटी आढळल्यास अर्ज बाद करण्यात येईल.

(मागील पानावर)

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कु.डॉ. ______________________________ श्री ________________

______________________ यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय:- वर्ष, राहणार ______________

यापुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की, १. मी ______________________________ या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. २. आज मला __________ (संख्या) इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या __________ इतकी आहे. ३. यात असलेल्या मुलांची संख्या दोन (०२) पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे. वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल, आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांकासह :-

| | |
|---|---|
| सोबत अर्जाचे शुल्क रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास) शासकीय शुल्क पावती क्र. , दि. / /२०२४. | प्राध्यापक व विभागप्रमुख यांची स्वाक्षरी (संमती/असंमती) |

टिप:- अर्जदाराने अर्जासोबत छायांकित सत्य प्रती जोडलेल्या असाव्यात. अर्जदाराने प्रत्येक पदासाठी / विषयासाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

अर्ज तपासणी व गुणांकण समिती :-

सदस्य सदस्य सदस्य

सदस्य अध्यक्ष

निवड समितीची स्वाक्षरी :-

सदस्य सदस्य सदस्य सदस्य सदस्य

सदस्य सदस्य सदस्य सदस्य अध्यक्ष

शिफारस मान्य/अमान्य

अधिष्ठाता
सर्वोपचार रुग्णालय, धुळे

Scanned with OKEN Scanner